आरती दत्ताची

आरती सद्‌गुरु दत्ताची । करुया मूळ स्वरूपाची ॥ धृ. ॥

त्रिगुणाचा अवतार । देव दत्त विश्वेश्वर । सगुण तोचि निर्विकार । मूळ माया औंकार । नाथांचा नाथ । माया विरहित । दत्त समर्थ । निर्गुण निरंजन तोचि ॥ १ ॥ करुया.. आरती..

जपी तपी संत मुनी । केले तूच आत्मज्ञानी । तेच असती तुझ्या ध्यानी । सत्य बोध करिती जनी । जगा आधार भक्ति निर्धार । सत्कर्म सार । सांगड तुझिया नामाची ॥ २ ॥ करुया.. आरती..

दत्त ध्यानी नंगा योगी । साधियले लप जगी । संसारात भागी त्यागी । भक्ता ठेवी सदा जागी । दत्ताचे नाम । भक्ति निष्काम । नित्य तव काम । मागणी विश्वनाथाची ॥ ३ ॥ करुया.. आरती..